**B.Com - I    Semester-I**

**Insurance – I**

# Question Bank

**Prof. Gujar K. S.**
**M.COM. (BUSS. Admn. & Adv. A/C) M.ED. SET (Edu. & Com.) NET. GDC&A. DMOA&FA Ph.D. (Appeared)**

---

1. आर्थिक स्थितीमुळे विमापत्राचे पुढील हप्ते भरणे शक्य नसल्यास विमेदार विमा थांबवून जमा रकमेपैकी योग्य रकमेची मागणी करतो त्यास ----- असे म्हणतात.

a) **अर्पण मूल्य**   b) जप्तीची रक्कम   c) मूळ किंमत   d) नफा

2. विमा कंपनी व विमेदार यांनी एकमेकांना सर्व माहितीची कल्पना देणे म्हणजेच ---- तत्व होय.

a) विमेयहित   b) **परस्पर विश्वास**   c) सहकाराचे   d) संभाव्यतेचे

3. खालीलपैकी कोणता विम्याचा हेतु नाही?

a) **नफा मिळवणे**   b) हानीची भरपाई   c) भविष्यकाळाची सोय   d) बचतीतून संरक्षण

4. उधारी वसूल न झाल्यास होणारे आर्थिक नुकसान भरून देणारे विमापत्र कोणते?

a) हमी विमा   b) **पत विमा**   c) मालमत्ता विमा   d) बेकारीचा विमा

5. विमा व्यवसायास मार्गदर्शक नियम व तथ्य यांना विम्याची ----- असे म्हणतात.

a) तंत्रे   b) **तत्वे**   c) वैशिष्ट्ये   d) विमापत्रे

6. विमा कंपनीने ----- स्वीकारणे म्हणजे जोखमीची सुरुवात होणे होय.

a) **विमाहप्ता** b) प्रस्ताव अर्ज c) प्रतिष्ठेचा दाखला d) सर्वेक्षण अहवाल

7. विमेयहित तत्व विम्याच्या ----- तत्वात समाविष्ट होते.

a) **प्राथमिक** b) दुय्यम c) साह्यकारी d) अंतर्गत

8. समाजातील दुर्बल घटकांना विम्याचे लाभ देण्यासाठी विमा महामंडळे ---- निधी उभारतात.

a) राखीव b) रोखता c) कायदेशीर d) **सुरक्षा**

9. ग्रामीण विमा करारात पुढीलपैकी कोणते विमापत्र येत नाही?

a) पोल्ट्री विमा b) पिक विमा c) मच्छीपालन विमा d) **हमी विमा**

10. खालीलपैकी कोणता सागरी विम्याचा उपप्रकार नाही?

a) जहाजाचा विमा b) जहाजातील मालाचा विमा c) **पत विमा** d) जबाबदारीचा विमा

11. नोकराच्या अप्रामाणिकपणामुळे होणारे नुकसान भरून निघण्यासाठी ----- विमा घेतात.

a) घरफोडी b) **प्रामाणिकपणाचा** c) बेकारीचा d) पत

12. खालीलपैकी कोणती हानी भरण्याची पद्धत नाही?

a) रोख रकमेत भरपाई b) वस्तू दुरुस्ती c) वस्तू बदलून देणे d) **शेअर्स देणे**

13. कोणत्या आयुर्विमा प्रकारात विमापत्राची रक्कम विमेदाराच्या हयातीत दिली जाते?

a) आजीवन b) **हयातीतील** c) वर्षासने d) सामूहिक विमा

14. तिसऱ्या व्यक्तीविरुद्ध असणारे हक्क दुसऱ्या व्यक्तीकडून प्राप्त करणे म्हणजे ----- तत्व होय.

a) **मालकीहक्क बदल** b) विमेयहित c) अंशदायित्वाचे d) सहकाराचे

15. ------ घेतेवेळीच विमेयहित असणे आवश्यक असते.

a) अग्निविमा b) सागरी विमा c) अपघात विमा d) **आयुर्विमा**

16. अंशदायित्वाचे तत्वाला ----- तत्व असेही म्हणतात.

a) **वर्गणीचे** b) सहकाराचे c) प्रत्यासनाचे d) संभाव्यतेचे

17. प्रत्येक व्यक्तीला स्वतःच्या आयुष्यात ----- हित असते.

a) **अमर्याद** b) मर्यादित c) काही प्रमाणात d) अनिश्चित

18. विमाहप्ता निश्चित करताना खालीलपैकी कोणता घटक विचारात घेतला जात नाही?

a) विमेदाराचे वय b) विमापत्राची रक्कम c) विमापत्राची मुदत d) **वारस**

19. कोणत्या आयुर्विमा प्रकारात विमापत्राची रक्कम विमेदाराला हयातीत न मिळता वारसास मिळते?

a) **आजीवन** b) मुदती c) वर्षासने d) सामूहिक विमा

20. निवृत्तीनंतर विमेदारास दरवर्षी निवृत्तिवेतन स्वरूपात रक्कम देणारी विमा योजना कोणती?

a) आजीवन b) मुदती c) **वर्षासने** d) सामूहिक विमा

21. ------ आयुर्विमा प्रकारात विमेदारास आयुष्यभर विम्याचे हप्ते भरावे लागतात.

a) **आजीवन** b) हयातीतील c) वर्षासने d) सामूहिक विमा

22. आयुर्विमापत्रधारकांनी आयुर्विमा पत्राचे सर्व अधिकार दुसऱ्यास देणे यास ----- असे म्हणतात.

a) **अभिहस्तांकन** b) अर्पण c) प्रस्ताव d) करार

23. ----- विमाप्रकारात विमाचालक विमेदारास तृतीय पक्षाचा विश्वास आणि प्रामाणिकपणाचे वर्त वर्तणुकीबाबत हमी देतो.

a) मालमत्ता b) व्यक्तिगत अपघात c) स्वास्थ्य d) **हमी**

24. विमाधारकास विमा संरक्षणबरोबर भांडवल वृद्धीचा लाभ मिळवून देणारा विमा योजनेचा प्रकार म्हणून ----- विमायोजने कडे पहावे लागते.

a) आरोग्य विमा b) **युनिट लिंकड** c) पिक विमा d) आजीवन

25. रीतसर दावा रक्कम मिळण्यासाठीचा अर्ज व इतर कागदपत्रे प्राप्तीनंतर विमा कंपनीने ----- दिवसांच्या मुदतीत दावा निकाली काढणे आवश्यक आहे.

a) **30** b) 60 c) 90 d) 10

26. जीवन विम्याचे क्षेत्र खाजगी क्षेत्रासाठी खुले करण्याचा निर्णय सरकारने सन ---- मध्ये घेतला.

a) **1999-2000**   b) 1998-1999   c) 2000-2001   d) 1997-1998

27. विमा व्यवसाययांचे नियमन व नियंत्रण करण्यासाठी ----- मध्ये विमा नियमन व विकास प्राधिकरण कायदा करण्यात आला .

a) **1999**   b) 1932   c) 1960   d) 2001

28. आयुर्विमा महामंडळ कायदा ----- या वर्षी संमत झाला.

a) **1956**   b) 1932   c) 1960   d) 2001

29. खालीलपैकी कोणती संस्था विमा व्यवसायाचे नियमन व नियंत्रण करते.

a) सेबी   b) ग्राहक न्यायालय   c) **आय आर डी ए**   d) आरबीआय

30. ----- रोजी विमा नियमन व विकास प्राधिकरण (आय आर डी ए) स्थापन करण्यात आले.

a) 19 मार्च 2000   b) 1 जुलै 2000   c) **19 एप्रिल 2000**   d) 1 जून 2002

31. विमा नियमन व विकास प्राधिकरण (आय आर डी ए) मध्ये जास्तीत जास्त किती सदस्य असतात?

a) 5   b) 20   c) **10**   d) 15

32. विमा नियमन व विकास प्राधिकरण (आय आर डी ए) मधील सदस्यांची नेमणूक कोणातर्फे करण्यात येते?

a) **केंद्र सरकार** b) राज्य सरकार c) आय आर डी ए) d) विमा कंपनी

33. विमा नियमन व विकास प्राधिकरण (आय आर डी ए) मधील सदस्यांचा पदाचा कालावधी किती वर्षाचा असतो?

a) 10 b) 20 c) **5** d) 15

34. खालीलपैकी कोणती खाजगी क्षेत्रातील विमा कंपनी नाही?

a) मॅक्स न्यूयॉर्क लाइफ b) **भारतीय आयुर्विमा महामंडळ** c) एसबीआय लाइफ d) बजाज आलियांज

35. खालीलपैकी कोणती संस्था विमा व्यवसायाशी संबंधित नाही?

a) मॅक्स न्यूयॉर्क लाइफ b) **आरबीआय** c) भारतीय आयुर्विमा महामंडळ d) बजाज आलियांज

36. विमा नियमन व विकास प्राधिकरणाचे (आय आर डी ए) मुख्य कार्यालय ---- येथे आहे.

a) **हैदराबाद** b) मुंबई c) केरळ d) सुरत

37. विमा नियमन व विकास प्राधिकरणाचे (आय आर डी ए) सर्वेअर शाखा कार्यालय ---- येथे आहे.

a) **नवी दिल्ली** b) मुंबई c) केरळ d) पणजी

38. विमा नियमन व विकास प्राधिकरणाचे (आय आर डी ए) खालीलपैकी कोणते उद्दिष्ट आहे?

a) **विमा क्षेत्राचे नियमन करणे** b) अर्थपुरवठा करणे c) बँकांवर नियंत्रण d) विमा व्यवसाय करणे

39. विमाधारकावरील अन्याय, भ्रष्टाचार, विम्यासंबंधित तक्रारी यासाठी (आय आर डी ए) ने ---- नेमले आहेत

a) पोलीस b) बॅंक अधिकारी c) विमा कंपनी d) **विमा लोकपाल**

40. आय आर डी ने देशातील सर्व राज्यांसाठी किती शहरांमध्ये लोकपालाची नियुक्ती केली आहे?

a) 10 b) **12** c) 36 d) 6